दि बेरार जनरल ऐज्युकेशन सोसायटी अकोला, द्वारा संचालित,

# श्री किसनलाल नथमल गोयनका कला व वाणिज्य महाविद्यालय,कारंजा लाड

# मराठी भाषा व वाङ्मय विभाग

# अहवाल २०१८-२०१९

## ' मराठी वाङ्मय मंडळ '

कारंजा तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची गरज लक्षात घेवून **दि बेरार जनरल ऐज्युकेशन सोसायटी अकोला** यांच्या पुढाकाराने अध्यक्षतेखाली **१९६१** साली **श्री.कि.न.महाविद्यालयाची'** ची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक सुविधा याच भागात मिळाव्यात व बाहेरगावी ये-जा करावी लागू नये, यासाठी विवा महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

याच विद्यार्थ्यांचा सामाजिक सांस्कृतिक विकास व्हावा, भाषेविषयीची गोडी वाढावी, आत्मविश्वास वाढावा यासाठी दिनांक 6 ऑक्टोबर २०१८ रोजी 'मराठी वांङ्मय मंडळ उदघाटन सोहळा' आयोजित केला. प्राचार्य डॉ विनय कोडापे, मराठी विभाग प्रमुख डॉ. सुनील राठोड, डॉ. किरण वाघमारे यांच्या उपस्थित व मार्गदर्शक पाहुणे म्हणून 'अप्पासाहेब स्वामी महाविद्यालयाचे शेन्दुर्जना आढाव' येथील मराठी विभाग प्रमुख **प्रा.डॉ गजानन मुंधे** यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी यवतमाळ येथील जयंत चावरे यांचा **हासू आणि आसू** हा विनोदी कार्यकम पार पाडला

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. किरण वाघमारे यांनी केले. **प्रा.डॉ गजानन मुंधे सरांनी** अमूल्य मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ विनय कोडापे यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप केला.


मराठी विभाग
आपले सहर्ष स्वागत करीत आहे
B.G.E.S AKOLA'S
K.N.COLLEGE
[ARTS & COMMERCE]
KARANJA (LAD)


मराठी विभाग
आपले सहर्ष स्वागत करीत आहे
B.G.E.S AKOLA'S
K.N.COLLEGE
[ARTS & COMMERCE]
KARANJA (LAD)
06 10 2018




दि 08/10/2018

सकाळ सोमवार,

# 'हासू आणि आसू'त न्हावून निघाले विद्यार्थी

## कि. न. गो. महाविद्यालयात मराठी वाङ:मय मंडळ स्थापन

**कारंजा, ता. ७ :** कोणाला हसविणे कठीण त्यापेक्षा रडविणे कठीण असले तरी किसनलाल नथमल गोयनका महाविद्यालयात एकाचवेळी हसण्याचा आणि रडण्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. कविता, कथा, किस्से आणि विनोदाच्या या मैफलीत 'हासु आणि आसु' मध्ये विद्यार्थी व उपस्थित प्राध्यापकवृंद न्हावून निघाले.

महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने मराठी वाङ:मय मंडळाची स्थापना करण्यात आली उद्घाटनपर कार्यक्रमात उद्घाटक यवतमाळ येथील जयंत चावरे यांनी 'हासु आणि आसु' ची मैफल मनोरंजनासोबतच प्रबोधन करणारी ठरली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विनय कोडापे होते. यावेळी मंचावर मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुनील राठोड, प्रा. डॉ.कि रण वाघमारे, मराठी वाङ:मय मंडळ अध्यक्ष पूजा खडसे आदी मान्वर उपस्थित होते.

आरंभी मान्यवरांच्या हस्त दीपप्रज्वलन व सरस्वती पुजन करण्यात आले. प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजना मागची भूमिका प्रा. डॉ. किरण वाघमारे यांनी विशद केली. पाहुण्यांचा परिचय देखील त्यांनी करुन दिला जयंत चावरे यांनी आई, बाप, सायकल, प्रेम अशा विविध विषयांवर काव्य आणि विनोदांची जुगलबंदी अतिशय बहारदार रंगविली सुरवातीला हसवित हसवित त्यांनी विद्यार्थ्यांना खेळविले उत्तरार्धात त्यांनी विद्यार्थ्यांच्या डोळ्यातुन आसु आणले. अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.विनय कोडापे यांनी आजच्या कार्यक्रमातून घेतलेला विचार जतन करा व आपल्या आई बापाचा सांभाळ करा असे आवाहन केले. त्यांनी वाङ:मय मंडळाची यावेळी घोषणा केली. यामध्ये अध्यक्ष पूजा खडसे, उपाध्यक्ष शाहीन फकीरावाले, सचिव आदेश वर व सदस्य म्हणून सागर हिरे, प्रियंका तुपटकर, अंकुश जामनिक व अंकुश वानखडे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे संचालन प्रांजली परकोटे व आरती वलुलर यांनी आभार करिश्मा जयराज हिंगे मानले. याप्रसंगी विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



कारंजा : गोयनका महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

देशोन्नती सोमवार, दि.८ ऑक्टोबर २०१८

# कि.न.गो.महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ स्थापन

*तालुका प्रतिनिधी /७ ऑक्टोंबर*

**कारंजा :** स्थानिक कि.न.गो. महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने ५ ऑक्टोंबर रोजी मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली.

कोणाला हसविणे कठीण त्यापेक्षा रडविणे कठिण असले तरी महाविद्यालयात एकाचवेळी हसण्याचा आणि रडण्याचा अनुभव विद्यार्थ्यांनी कार्यक्रमा दरम्यान घेतला. कविता, कथा, किस्से आणि विनोदाच्या या मैफलीत 'हासु आणि आसु' मध्ये विद्यार्थी व उपस्थित प्राध्यापकवृंद न्हावून निघाले. उद्घाटक म्हणून यवतमाळ येथील जयंत चावरे यांनी 'हासु आणि आसु' ची




मैफल मनोरंजनासोबतच प्रबोधन करणारी ठरली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विनय कोडापे, मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सुनील राठोड, प्रा.डॉ.किरण वाघमारे, मराठी वाङ्मय मंडळ अध्यक्ष पुजा खडसे उपस्थित होते. प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजना मागची भूमिका प्रा.डॉ.किरण वाघमारे यांनी विशद केली. जयंत चावरे यांनी आई,बाप,सायकल,प्रेम अशा विविध विषयांवर काव्य आणि विनोदांची जुगलबंदी अतिशय बहारदार रंगविली. सुरुवातीला हसवित हसवित त्यांनी विद्यार्थ्यांना खेळविले उत्तरार्धात त्यांनी विद्यार्थ्यांच्या डोळ्यातुन आसु आणले.

अध्यक्षीय मार्गदर्शन प्राचार्य डॉ.विनय कोडापे यांनी केले. मराठी वाङ्मय मंडळ पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष पुजा खडसे, उपाध्यक्ष शाहीन फकीरावाले, सचिव आदेश वर व सदस्य म्हणून सागर हिरे, प्रियंका तुपटकर, अंकुश जामनिक व अंकुश वानखडे यांचा समावेश आहे. संचलन प्रांजली परकोटे व आरती वलुलर तर आभार करिश्मा जयराज हिने मानले. याप्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




# कि.न.गो. कॉलेज में कार्यशाला

**कारंजा लाड़ :** स्थानीय कि. न. गो. महाविद्यालय में मराठी विभाग की ओर से जिला स्तरीय कार्यशाला गत दिन संपन्न हुई. कार्यशाला का उद्घाटन साहित्यिक डॉ. श्रीकांत तिड़के ने किया. अध्यक्ष के रूप में प्राचार्य डॉ. विनय कोडापे ने की. मार्गदर्शक के रूप में अकोला आकाशवाणी के कार्यक्रम अधिकारी विजय दलवी, साधन रेडियो अमरावती के समन्वयक संजय घरड़े उपस्थित थे.

मंच पर मराठी विभाग प्रमुख डॉ. सुनील राठोड़, राजेश प्रेंग तथा विश्वविद्यालय प्रतिनिधि शुभम मोराले एवं मराठी साहित्य मंडल अध्यक्ष फरजाना मुन्नीवाले उपस्थित थे. कार्यशाला में संचालन को लेकर मार्गदर्शन किया गया. प्रस्तावना डॉ. सुनील राठोड़, संचालन डॉ. किरण वाघमारे तथा आभार प्रदर्शन फरजाना मुन्नीवाले ने किया.

लोकमत समाचार 29/1/18